### खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

### राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ वार्षिक सर्वसाधारण सभा

पुण्य नगरी



## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची वार्षिक सभा उत्साहात

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी संस्थेच्या वार्षिक अहवालाचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले.

विषयपत्रिकेनुसार झालेल्या चर्चेत ॲड.आर.एस.घोलप, सतीश चांभारे, अविनाश कहाणे, काळूराम कड, ॲड.पोपटराव तांबे, गणेश थिगळे, सुरेश डुंबरे, गणेश घुमटकर आदी सभासदांनी सहभाग घेऊन संस्थेच्या कामकाजाबद्दल आनंद व्यक्त केला. नवीन विस्तारित इमारत बांधकाम, विद्यार्थिनी सुरक्षितता, प्रवेश घेतलेल्या व परीक्षेचा फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांच्या थकीत शुल्कासंदर्भात सभेत चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

५० वर्षांपूर्वी संस्थापक अध्यक्ष ॲड. साहेबराव बुट्टे पाटील यांनी उच्च शिक्षणाचे संधी तालुक्यातील गरीब, आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना मिळावी म्हणून ही शिक्षणसंस्था स्थापन केली. आज संस्थेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष सुरू असून लोकनेते शरद पवार यांचा भक्कम पाठिंबा आणि सर्व सभासदांच्या योगदानामुळे संस्थेची वाटचाल सुरू असल्याचे संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी सांगितले. महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल

ॲड. राजमाला बुट्टे पाटील तसेच संस्थेचे ज्येष्ठ सभासद साहेबराव देशमुख, मारोतराव बारणे, नामदेवराव कलवडे, चंदरराव मोहिते, दशरथ ढोबळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले. प्रास्ताविक संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले तर आभार हिरामण सातकर यांनी मानले.

Pimpri Chinchwad Edition Edition
Sep 16, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख